आपल्या स्वप्नांना नियोजनाची जोड देणे गरजेचे -डॉ. चेतन नरके

"आपल्या जीवनात आपल्याला यशस्वी व्हायचे असेल तर सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे नियोजन होय. ते झाल्यास आपणास यशस्वी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. तुम्हाला तुमचा कल माहीत असणे गरजेचे असून सायक्रोमेट्रिक ऍनालिसिसद्वारे विद्यार्थ्यांना कोणते करिअर निवडावे याचा अंदाज घेता येतो. तसेच आपल्या करिअरमध्ये यशस्वी व्हायचे असेल तर तुम्ही टीमवर्कमध्ये कसे काम करता, तुमचे संभाषण कौशल्य कसे आहे यावर तुमचे यश अवलंबून आहे. आज तुम्हाला तुमचे करिअर घडवायचे असल्यास आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूलचा वापर करून आपला प्रवास सुरू करावा लागेल तसेच किमान दररोज एक तास तरी वाचन करावे लागेल. त्याचबरोबर व्यायाम आणि प्राणायाम याची साथ देखील घेणे गरजेचे आहे." असे प्रतिपादन अरुण नरके फाउंडेशनचे प्रेसिडेंट डॉ. चेतन नरके यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे बँकिंग व सरळसेवा भरती परीक्षाची तयारी कशी करावी यासाठी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. यावेळी अरुण नरके फाउंडेशन व श्री व्यंकटेश महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग स्पर्धा परीक्षांच्या तयारीचे मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. चेतन नरके यांनी बँकिंग स्पर्धा परीक्षाची पद्धती कशी आहे तसेच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन स्तरावरच कशाप्रकारे तयारी केली पाहिजे याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मा. प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर सी. एम. ए. फाउंडेशन परीक्षेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर द्वितीय सत्रात बँकिंग स्पर्धा परीक्षा संदर्भात अरुण नरके फाउंडेशनचे विषय तज्ञ श्री .शिवकुमार पवार यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर अरुण नरके फाउंडेशन, कोल्हापूर सेंटरचे ब्रांच ब्रांच ऑफिसर श्री. रमेश कामत यांनी सरळसेवा भरतीची तयारी याविषयी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांनी याविषयी का जागृत झाले पाहिजे याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी मोहिनी अंचलिया हिने केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले. तर पाहुण्यांची ओळख प्राध्यापिका डॉ. एस. आर. ठाकर यांनी करून दिली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील 300 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तसेच कार्यक्रमाचे आभार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख श्री. एम. पी. केसरकर यांनी मांडले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


KARANJI.
QUALITY
ISO
CERTIFICATION
Shri Venkatesh Mahavidyalaya,